महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१
Web : www.dirhe.org.in
E-Mail : info@dirhe.org.in

☎ (०२०) २६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११९५३

क्र.अशाम/२००७/संघटना/मवि-१. / ५८२९ दि.१६/८/२००७

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

२. प्राचार्य/प्राचार्या,
महाराष्ट्र राज्यातील सर्व अशासकीय कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये.

सह संचालक ( उच्च शिक्षण )
पुणे विभागीय कार्यालय
पुणे
आवक क्र. 1233
दिनांक 2 AUG 200

**विषय:** अनुदानीत महाविद्यालयात विना अनुदानित तत्वावर चालणाऱ्या विभिन्न अभ्यासक्रम/विषयांसाठी अतिरीक्त कर्मचाऱ्यांची नेमणूक अथवा संबंधीत कर्मचाऱ्यांना अतिरिक्त मोबदला देण्याबाबत.

महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघटनेने या संचालनालयाच्या असे निदर्शनास आणून दिले आहे की, बहुतांश महाविद्यालयात विना अनुदान तत्वावर बीएमएम, बीएमएस, बी.एससी. आयटी, बी.एससी. कॉम्प्युटर सायन्स, बी.एससी. बायोटेक्नॉलॉजी, एम.एससी. कॉम्प्युटर सायन्स, एम. एससी. आयटी, एम.एससी. बायोटेक्नॉलॉजी, एम.एससी. इंडस्ट्रियल केमिस्ट्री, एम.एससी. एन्वायरमेंटल सायन्स व अन्य अभ्यासक्रम चालू केले आहेत. सदर अभ्यासक्रमासाठी काही महाविद्यालयांमध्ये १००० पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या आहे. तरी सुद्धा या अभ्यासक्रमांसाठी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नेमणूक केली जात नाही. तसेच अनुदानित महाविद्यालयातील असणाऱ्या कर्मचाऱ्यांकडूनच विना अनुदानित अभ्यासक्रमाचे कामकाज जबरदस्तीने करून घेतले जाते. काही महाविद्यालयांमध्ये विना अनुदानित अभ्यासक्रमातील कामकाजाचा मोबदला सुद्धा दिला जात नाही. या संदर्भातील मुंबई विद्यापीठाचे परिपत्रक क्रमांक फनकॉल/४८८/ऑफ २००३ दिनांक १६.१०.२००३ अन्वये अशी विनंती केली होती की, विना अनुदानित अभ्यासक्रमासाठीसुद्धा जो आकृतीबंध अनुदानित महाविद्यालयासाठी लागू आहे त्याच धरतीवर विद्यार्थी संख्येच्या आधारे तेथे प्रयोगशाळा सहाय्यक, प्रयोगशाळा परिचर, लेखनिक, शिपाई या पदावर नेमणूका करणे गरजेचे आहे. ज्या ठिकाणी या कामाकरीता अशा नेमणूका झालेल्या नाहीत तेथे सद्या काम करत असलेल्या अनुदानित शाखेतील कर्मचाऱ्यांना हे काम अतिरक्त समजून त्यांना त्याचा उचित मोबदला दिला जावा. या संचालनालयातर्फे क्रमांक एनजीसी–१९९४/२२३९४/नेमणुक/९–अ दिनांक १९.०४. १९९४ च्या परिपत्रकानुसार 'विना अनुदानित पदव्युत्तर वर्गाची कामे अनुदान विभागासाठी मान्य

..२..

कर्मचाऱ्यांकडून करवून घेण्यात येत असल्यास अशा कर्मचाऱ्यांना अतिरिक्त वेतन देण्यासंबंधी संबधित महाविद्यालयांना सूचना द्याव्यात'' अशा प्रकारचे स्पष्ट आदेश सर्व विभागीय प्रशासन अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत.

आमच्या निदर्शनास असे आले आहे की, बहुतांश महाविद्यालयात उच्च शुल्के घेऊन अभ्यासक्रम चालविले जातात. तरी सुद्धा आकृतीबंधाप्रमाणे नेमणुका न करता अनुदानित शाखेतील कर्मचाऱ्यांकडून कामकाज करून घेऊन त्यांना संबंधीत कामाचा उचित मोबदला दिला जात नाही. या संदर्भात आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, आपण असा अभ्यासक्रम चालू करतांना शासनास व विद्यापीठास जे हमीपत्र सादर केले आहे त्यामध्ये नमुद केले आहे की, त्या अभ्यासक्रमासाठी स्वतंत्ररित्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नेमणुका करून त्यांना प्रचलित नियमाप्रमाणे वेतन व भत्ते अदा करण्यात येईल. आदेशाचे पालन करून या अभ्यासक्रमासाठी मिळालेल्या शुल्कातून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रचलित नियमानुसार वेतन व भत्ते देण्याची व्यवस्था करावी. या बाबतीत यापुढे कुठल्याही प्रकारची तक्रार येणार नाही याची दक्षता घ्यावी.

(डॉ.का.म.कुळकर्णी)
शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी
१. सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलसचिव
२. डॉ. आर. बी. सिंह, सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी महासंघ